“आरोग्याच्या
सुपर स्पेशालिटी सेवा
एकाच छताखाली”

# वृत्तपत्रिका

जुलै २०२६

मराठवाडा मेडिकल ॲण्ड रिसर्च इन्स्टीट्यूट

# कमलनयन बजाज हॉस्पिटल




मराठवाड्यातील एक विश्वसनीय रूग्णालय | अद्ययावत सुविधा व वैद्यकिय उपकरणांनी सुसज्ज | अनुभवी व निष्णात डॉक्टर्स
सर्व समावेशक सुविधा एकाच छताखाली असणारे रूग्णालय | मुत्रपिंड, यकृत आणि हृदय प्रत्यारोपण साठी मान्यता प्राप्त रूग्णालय

# “डॉक्टर्स डे 2026 उत्साहात साजराआयोजन”

1 July 2026






कमलनयन बजाज हॉस्पिटलमध्ये 1 जुलै 2026 रोजी डॉक्टर्स डे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. "Healing Hands, Caring Hearts, Inspiring Lives" या संकल्पनेवर आधारित या विशेष कार्यक्रमात रुग्णसेवेसाठी समर्पित असलेल्या डॉक्टरांचा गौरव करण्यात येणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात स्वागत व प्रास्ताविकाने होऊन, त्यानंतर हॉस्पिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस, यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

याशिवाय सांस्कृतिक कार्यक्रम, संगीत व नृत्य सादरीकरणे, पारितोषिक वितरण, सर्व डॉक्टरांना गुलाबाच्या रोपांचे वितरण तसेच सामूहिक छायाचित्राचा समावेश असणार आहे. समाजाच्या आरोग्यसेवेसाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या वैद्यकीय तज्ज्ञांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि त्यांच्या सेवेला सलाम करण्यासाठी हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

# “कमलनयन बजाज हॉस्पिटलला राष्ट्रीय स्तरावरील आणखी एक मानाचा सन्मान”

4 July 2026

कमलनयन बजाज हॉस्पिटल आणि नर्सिंग महाविद्यालयाने गुणवत्ता, रुग्णसुरक्षा आणि नाविन्यपूर्ण आरोग्यसेवेतील उत्कृष्ट कार्याची आणखी एक राष्ट्रीय पातळीवर दखल मिळवली आहे. क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया (QCI) आणि NABH यांच्या वतीने पुणे येथे आयोजित गुणवत्ता महोत्सव 2026 मध्ये हॉस्पिटलला 'ज्युरीज चॉईस – द्वितीय क्रमांक' हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

आरोग्यसेवेत सर्वोत्तम पद्धतींचा अवलंब, रुग्णकेंद्री सेवा, सुरक्षितता आणि सातत्यपूर्ण गुणवत्ता सुधारणा यासाठी हा सन्मान देण्यात आला. ही कामगिरी हॉस्पिटलच्या संपूर्ण वैद्यकीय, परिचारिका आणि प्रशासकीय टीमच्या समर्पणाचे आणि उत्कृष्ट सेवाभावाचे प्रतीक असून, भविष्यातही दर्जेदार व विश्वासार्ह आरोग्यसेवा देण्याची प्रेरणा आहे.



Marathwada Medical & Research Institute

**Kamalnayan Bajaj Hospital**

The Complete Hospital

## Your Health, Our Priority

# SUNDAY OPD

**EVERY SUNDAY**
10:00 AM to 12:00 Noon



## CONSULT OUR EXPERT SPECIALISTS

| Dr. Ankita Bobade | Dr. Girija Jalnapurkar | Dr. Milind Vaishnav | Dr. Mahesh Patil | Dr. Ajay Vasant Rotte |
|---|---|---|---|---|
| Consultant OBGYN | ENT Specialist | Consultant Physician | Geriatric Expert | Diabetes, Obesity Consultant & Yoga Therapist |

For More Details Contact: **Mr. Krushna Jadhav** **8830434676**

STAY CONNECTED

Gut No. 43, Bajaj Marg, Satara Parisar, Beed Bypass Road, Chhatrapati Sambhajinagar.

@Kamalnayan Bajaj Hospital    www.bajajhospital.com

## “महिलांच्या आरोग्यसेवेत आणखी एक ऐतिहासिक टप्पा”

10 July 2026

कमलनयन बजाज हॉस्पिटलने स्त्रीरोग विभागात 100 रोबोटिक शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करून आणखी एक महत्त्वपूर्ण मैलाचा दगड गाठला आहे. डॉ. प्रेरणा देवधर यांच्या नेतृत्वाखाली आधुनिक रोबोटिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सुरक्षित, अचूक आणि कमी वेदनादायक शस्त्रक्रिया रुग्णांना उपलब्ध करून दिल्या जात आहेत. या तंत्रज्ञानामुळे जलद बरे होणे, कमी गुंतागुंत आणि उत्तम उपचार परिणाम साध्य होत असून महिलांच्या आरोग्यसेवेत उत्कृष्टतेचा नवा आदर्श कमलनयन बजाज हॉस्पिटलने निर्माण केला आहे.




## “प्रोजेक्ट 'आरोग्य मम्मे'चा शुभारंभ : महिलांच्या आरोग्य संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण पाऊल”

22 July 2026





महिलांमधील स्तनाच्या कर्करोगाचे लवकर निदान आणि प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने कमलनयन बजाज हॉस्पिटल आणि छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने 'प्रोजेक्ट आरोग्य मम्मे' या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात येणार आहे. या अंतर्गत महानगरपालिकेतील सर्व महिला कर्मचाऱ्यांसाठी मोफत मॅमोग्राफी तपासणी अभियान राबविण्यात येणार आहे.

महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आणि स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम महिलांच्या आरोग्याबाबत जनजागृती, वेळेवर निदान आणि योग्य उपचारांना चालना देणारा ठरणार आहे. या उपक्रमाचे उद्घाटन छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे महापौर मा. श्री. समीर राजूरकर यांच्या हस्ते होणार असून, विविध मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहेत. महिलांच्या निरोगी भविष्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असून समाजातील प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेला नवी दिशा देणार आहे.

Marathwada Medical & Research Institute

**Kamalnayan Bajaj Hospital**

The Complete Hospital

# मोफत

## गरोदरपणातील तपासणी (ANC) OPD

## दर गुरुवारी

**सकाळी 10:00 ते दुपारी 04:00**

सुरुवात

**28 मे 2026 पासून**

मार्गदर्शन

**डॉ. वेदत्रयी देशमुख**

वरिष्ठ सल्लागार, स्त्रीरोग व प्रसूती तज्ज्ञ

प्रत्येक
आईला आयुष्याची
सर्वोत्तम सुरुवात
मिळायलाच हवी.



**10%**
**सवलत**
निवडक
तपासण्यांवर

### मोफत सेवा

- ANC सल्ला
- रक्तदाब तपासणी
- वजन तपासणी
- गर्भारपण समुपदेशन
- आहार व जीवनशैली मार्गदर्शन
- गरोदरपणातील प्राथमिक जोखीम तपासणी

### निवडक तपासण्यांवर सवलत

- CBC
- ब्लड शुगर
- थायरॉईड प्रोफाइल
- सोनोग्राफी
- युरिन तपासणी
- Hb
- व्हिटॅमिन D / B12
- अँटेनटल पॅनेल्स

अनुभवी स्त्रीरोग तज्ज्ञांकडून मार्गदर्शन

अत्याधुनिक सुविधा

संवेदनशील व वैयक्तिक काळजी

आई व बाळासाठी सुरक्षित आणि विश्वासार्ह हॉस्पिटल

**अपॉइंटमेंटसाठी संपर्क** 022 6623 2222, 90049 33444

STAY CONNECTED

Gut No. 43, Bajaj Marg, Satara Parisar, Beed Bypass Road, Chhatrapati Sambhajinagar.

@Kamalnayan Bajaj Hospital www.bajajhospital.com

## “अत्याधुनिक फिलिप्स Affiniti 70G सोनोग्राफी प्रणालीचे उद्घाटन”

23 July 2026





महिलांचे आरोग्य, सुरक्षित मातृत्व आणि अचूक निदान सेवांना अधिक बळकटी देण्यासाठी कमलनयन बजाज हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक Philips Affiniti 70G Ultrasound (Sonography) System सुरू करण्यात येत आहे. या नव्या प्रणालीमुळे गर्भवती माता, गर्भातील बाळ तसेच महिलांच्या विविध आजारांचे अधिक अचूक, जलद आणि विश्वासार्ह निदान शक्य होणार आहे.

या अत्याधुनिक यंत्रणेच्या उद्घाटनप्रसंगी भ्रूणवैद्यक तज्ज्ञ डॉ. अर्चना पाटील प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानाचा अवलंब करून रुग्णांना उत्कृष्ट आरोग्यसेवा देण्याच्या कमलनयन बजाज हॉस्पिटलच्या वचनबद्धतेतील हा आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

## “जॉन्सन अँड जॉन्सनकडून कमलनयन बजाज हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक प्रशिक्षण”

23 July 2026






रुग्णसेवेचा दर्जा अधिक उंचावण्यासाठी कमलनयन बजाज हॉस्पिटलमध्ये Johnson & Johnson Institute on Wheels अंतर्गत विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमामध्ये मोबाईल स्किल लॅब, अत्याधुनिक वैद्यकीय सिम्युलेशन्स, हँड्स-ऑन स्किल प्रशिक्षण तसेच Velys Robotic-Assisted Surgery विषयावरील विशेष मार्गदर्शन देण्यात आले.

या प्रशिक्षणाद्वारे डॉक्टर, परिचारिका आणि आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, प्रगत शस्त्रक्रिया पद्धती आणि प्रत्यक्ष अनुभवावर आधारित कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळाली. जागतिक दर्जाच्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून अधिक सुरक्षित, अचूक आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा रुग्णांपर्यंत पोहोचवण्याच्या कमलनयन बजाज हॉस्पिटलच्या वचनबद्धतेला या उपक्रमामुळे अधिक बळ मिळाले.

# “आषाढी एकादशीचा उत्साहपूर्ण जल्लोष कमलनयन बजाज हॉस्पिटलमध्ये”

24 July 2026





कमलनयन बजाज हॉस्पिटलमध्ये आषाढी एकादशी मोठ्या भक्तिभावाने, उत्साहाने आणि आनंदमय वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी विठ्ठल-रुक्मिणीच्या गजरात अभंग, भक्तिगीते आणि पारंपरिक नृत्य सादर करण्यात आले. डॉक्टर, परिचारिका, कर्मचारी आणि उपस्थितांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत भक्तिरसात तल्लीन होऊन या सोहळ्याचा आनंद घेतला.

भक्ती, संस्कृती आणि एकात्मतेचा सुंदर संगम घडवणाऱ्या या उपक्रमामुळे हॉस्पिटल परिसरात सकारात्मक आणि आनंददायी वातावरण निर्माण झाले. आरोग्यसेवेसोबतच सामाजिक व सांस्कृतिक मूल्ये जपण्याच्या कमलनयन बजाज हॉस्पिटलच्या परंपरेचे हे आणखी एक सुंदर उदाहरण ठरले.

# “जन्मजात स्कोलिओसिसवर यशस्वी शस्त्रक्रिया; प्रणिता चौहानला नवजीवन”



जन्मापासूनच स्कोलिओसिस (पाठीच्या कण्याचा वाकडेपणा) या आजाराने त्रस्त असलेल्या प्रणिता चौहान यांना कालांतराने तीव्र पाठदुखीचा सामना करावा लागत होता. पाठीचा कणा अधिकाधिक वाकत गेल्याने त्यांना उभे राहणे, चालणे आणि दैनंदिन कामे करणेही अत्यंत कठीण झाले होते. अनेक ठिकाणी उपचारासाठी प्रयत्न करूनही शस्त्रक्रियेचा खर्च परवडत नसल्याने कुटुंब चिंतेत होते.

अखेर त्यांनी कमलनयन बजाज हॉस्पिटलचे स्पाईन सर्जन डॉ. अनुज भरुका यांची भेट घेतली. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती जाणून घेतल्यानंतर हॉस्पिटल व्यवस्थापनाने सामाजिक बांधिलकी जपत शस्त्रक्रिया 100% धर्मादाय योजनेअंतर्गत करण्याचा निर्णय घेतला.

डॉ. अनुज भरुका यांच्या मार्गदर्शनाखाली शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. उपचारानंतर हॉस्पिटलच्या डॉक्टर, नर्सिंग आणि व्यवस्थापनाने रुग्णाची विशेष काळजी घेतली. अवघ्या आठ दिवसांत प्रणिता चौहान स्वतःच्या पायावर चालत आनंदाने घरी परतल्या.

ही यशस्वी शस्त्रक्रिया केवळ एका रुग्णाला नवजीवन देणारी ठरली नाही, तर उत्तम वैद्यकीय सेवा आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा सुंदर संगम कमलनयन बजाज हॉस्पिटलने पुन्हा एकदा सिद्ध केला.

Marathwada Medical & Research Institute

**Kamalnayan Bajaj Hospital**

The Complete Hospital

# Teleconsultation Service

## Your health, now just a click away

**For More Information, Please Contact:**

Mr. Ankush Kore - 9096331517 | Mr. Krushna Jadhav - 8830434676



STAY CONNECTED

Gut No. 43, Bajaj Marg, Satara Parisar, Beed Bypass Road, Chhatrapati Sambhajinagar.

@Kamalnayan Bajaj Hospital

www.bajajhospital.com